महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सूचना का अधिकार

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**
CIN No.U40109MH2005SGC153646
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अउदा संवसु विभाग,
प्रकाश सरिता, नविन प्रशासकीय इमारत, बी - विंग, तळ मजला,
मोर्शी रोड, अमरावती ४४४६०३
Email–ee1110@mahatransco.in

काअ/अउदा/संवसु/विभाग/अम./मासं/ No 01290 दिनांक :- 17 SEP 2026

## जाहिर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून **"विजतंत्री"** (Electrician) या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, अउदा संवसु विभाग, महापारेषण, अमरावती अंतर्गत वर्ष २०२६-२७ करीता शिकाऊ उमेदवारीकरिता एक वर्ष कालावधीसाठी करारबद्ध करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी http//www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करीता **दि. १८/०९/२०२६ ते दि. ३०/०९/२०२६** च्या २३:५९ वाजेपर्यंत खालील नमूद आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करावे. आस्थापना नोंदणी क्रमांक व शिकाऊ उमेदवारी जागांचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| अनु.क्र. | आस्थापनाचे नाव | आस्थापना नोंदणी क्रमांक | विजतंत्री |
|---|---|---|---|
| १ | **अउदा संवसु विभाग, म.रा.वि.पारेषण कं.मर्या., अमरावती** | E01172700169 | २५ |

१) **शैक्षणिक अर्हता** :-

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण.

२. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून **"विजतंत्री"** (Electrician) या व्यवसायात परिक्षा उत्तीर्ण.

२) **शैक्षणिक दस्तावेज** :-

१. एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री चार सेमिस्टरचे उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्राची मुळप्रत

२. शाळा सोडल्याचा दाखला

३. आधार कार्ड

४. मागासवर्गीय असल्याचे जात प्रमाणपत्र

५. महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र

६. प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अजा व अज या प्रवर्गातील उमेदवार वगळून)

७. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

८. सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) उमेदवारांकरिता तहसिलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र. व इतर सर्व अनुषांगिक आवश्यक कागदपत्रांची मुळप्रत उमेदवाराने स्वतःच्या प्रोफाईलवर स्कॅन करुन अपलोड करावे.

३) **विद्यावेतन** :- प्रचलित नियमाप्रमाणे लागू राहिल.

४) नमुद जागांची संख्या कमी-अधिक करण्याचे व भरती प्रकियेशी निगडीत असलेले निर्णय घेण्याचे सर्व अधिकार व्यवस्थापन राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारांस कळविला जाणार नाही.

५) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडून दबाव आणल्यास, वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल / अपात्र ठरविण्यात येईल.

६) उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करुन योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. वरील कालावधीत (Online) अर्ज सादर न केल्यास त्या नंतरच्या कालावधीत आलेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

७) अपुर्ण, चुकीचे व अपु-या कागदपत्रासह सादर केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारल्या जाणार नाही. अथवा त्यांचा विचार केल्या जाणार नाही. तसेच अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चूकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरेल.

८) एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री गुणपत्रिकेवरील नाव आधार कार्ड मधील नावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे, अन्यथा आपला अर्ज स्विकारला जाणार नाही.

९) वयोमर्यादा दि. ०१/०९/२०२६ रोजी १८ वर्षांपेक्षा कमी व ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिल)

१०) ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित E-Mail Id व चालू भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक राहील.

११) शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय. परिक्षेचे मिळून एकूण प्राप्त गुणांच्या ५० : सरासरीच्या आधारे गुणवत्ते यादी नुसार तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहुन प्रवर्गनिहाय केली जाईल.

१२) आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांस या कार्यालयाने वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधीत कागदपत्रांची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१३) सदर भरती प्रक्रियेकरीता फक्त **दि. १८/०९/२०२६ ते दि. ३०/०९/२०२६** दरम्यान ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचाच विचार केला जाईल. वर नमुद दिनांकाच्या पुर्वी व नंतर ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा भरती/निवड प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही याची सुध्दा नोंद घ्यावी.

१४) ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर या जाहीरातीसह जोडलेला प्रपत्र अ परीपूर्ण भरुन त्यासह ऑनलाईन नोंदणी केलेल्या अर्जाची प्रत (Online Registration) व मुद्दा क्र. ०२ मध्ये नमूद आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत / स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती व इतर कागदपत्रे दि. १५/१०/२०२६ सायं. ०६:०० वाजेपर्यंत **कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अउदा संवसु विभाग, "प्रकाश सरिता", प्रशासकीय ईमारत, बि विंग, तळमजला, वेलकम पॉईंट जवळ, मोर्शी रोड, अमरावती-४४४६०३** या पत्त्यावर पोस्टाने किंवा स्वहस्ते कार्यालयीन वेळेत पोहचेल या बेताने पाठवावे. तसेच सदर प्रपत्र आवश्यक कागदपत्र / प्रमाणपत्रांसह विहीत मुदतीत दि. १५/१०/२०२६ नंतर पोस्टाने किंवा स्वहस्ते प्राप्त होणा-या अर्जाचा भरती / निवड प्रक्रियेसाठी विचारात घेतला जाणार नाही तसेच सदर अर्ज भरती / निवड प्रक्रियेतून बाद केल्या जातील, याची नोंद घ्यावी.

**सहपत्र** : अर्जाचा नमुना (प्रपत्र अ)

(जयंत र. एदलाबादकर)
**कार्यकारी अभियंता,**
**अउदा संवसु विभाग, अमरावती.**

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

प्रपत्र अ

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, मर्यादित.

अंतर्गत कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, अमरावती
या कार्यालयाच्या जाहिरातीनुसार करावयाचा अर्ज : वर्ष २०२६-२७

उमेदवाराने अलिकडे काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो येथे चिटकवावा व त्यावर स्वाक्षरी करावी. (स्टेपल किंवा पीन लावू नये)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पूर्ण नाव | (अडनाव) | (उमेदवाराचे नांव) | (वडिलांचे / पतीचे नाव) |
| २ | उमेदवाराच्या वडीलांचे पूर्ण नाव | (अडनाव) | (वडिलांचे नाव) | (आजोबांचे नाव) |
| ३ | लिंग व वैवाहिक स्थिती (लागू असलेल्या ठिकाणी ☑अशी खूण करावी) | (स्त्री) (Female) | (पुरुष) (Male) | (विवाहीत) (Married) | (अविवाहीत) (Unmarried) |
| ४ | उमेदवाराचा कायमचा पत्ता | पिनकोड | | |
| ५ | उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता | पिनकोड | | |
| ६ | दूरध्वनी / मोबाईल क्र. | कोड-दूरध्वनी क्र. | मोबाईल क्र. | |
| ७ | ई - मेल आयडी | | | |
| ८ | जन्म दिनांक | दिनांक | महिना | वर्ष |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | जातीचा प्रवर्ग (लागू असलेल्या ठिकाणी ☑अशी खूण करावी) | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सा.शै.मा. | ई.डबलू.एस. | खुला |
| | | SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN |
| | | | | | | | | | | | | |

| १० | शैक्षणिक पात्रता : (प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | परिक्षेचे नांव | शाळा / मंडळ / विद्यापीठ / संस्थेचे नांव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकूण गुण | मिळालेले एकूण गुण | एकुण टक्केवारी |
| १ | एस. एस. सी. (१०वी) | | | | | |
| २ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र | | | | | |

| ११ | जोडावयाची आवश्यक कागदपत्रे (लागू असलेल्या ठिकाणी ☑अशी खूण करावी) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस. एस. सी. (१०वी) गुणपत्रिका जोडली आहे का ? | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |
| २ | आय. टी. आय. (औद्यागिक प्रशिक्षण संस्था) गुणपत्रिका जोडली आहे का ? | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |
| ३ | शाळा सोडल्याचा दाखला सोबत जोडली आहे का ? | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |
| ४ | आधार कार्ड सोबत जोडली आहे का ? | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |
| ५ | महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-यांनी दिलेले जातीचा दाखला जोडले आहेत का ? | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |
| ६ | महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम जात पडताळणी समितीने वैध केलेले जाती वैधता प्रमाणपत्र जोडले आहे ? | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |
| ७ | उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non Creamy Layer) जोडले आहे का ? (अनु. जाती / अनु जमाती वगळून) | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |
| ८ | महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकारींनी दिलेले अधिवास (Domicile) प्रमाणपत्र जोडला आहे का ? | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |
| ९ | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) उमेदवारांकरीता शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र जोडले आहे का ? | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |
| १० | सामाजिक आणि शैक्षणिक मागास (SEBC) उमेदवारांकरीता शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र जोडले आहे का ? | होय Yes | ☐ | नाही No | ☐ |

## प्रतिज्ञापत्र

१. मी............................................................ असे प्रमाणित करतो / करते की, म.रा.वि.पा.कं.मर्यादीत या कंपनीच्या कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, अमरावती यांच्या कार्यालयाने प्रस्तुत दिलेली जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असून ती मला समजली आहे. सदर जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी, संपूर्ण व योग्य असून ती चुकीची वा खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील, याची मला पूर्णपणे जाणीव आहे. तसेच, मी सादर केलेली कोणतीही माहिती निवड प्रकियेच्या कोणत्याही टप्प्यावर खोटी अथवा बनावट आढळून आल्यास मला निवड प्रकियेतून बाद करण्यात येईल.

२. मी असेही प्रमाणित करतो/करते की,माझी निवड झाल्यास मी विभागाच्या/मंडळाच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही टिकाणी रुजू होण्यास तयार राहील.

३. मी असेही प्रमाणित करतो / करते की, जाहिरातीत विहीत केलेल्या अटी व शर्ती व निवडप्रकिया मला मान्य राहतील.

स्थळ : ____________

उमेदवाराची स्वाक्षरी